# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : बीआयई-२०२०/प्र.क्र.६००/२०/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०२०

प्रति,

१) विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
औरंगाबाद विभाग, पुणे विभाग, नागपूर विभाग
पदवीधर मतदारसंघ

२) विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
पुणे विभाग, अमरावती विभाग
शिक्षक मतदारसंघ

विषय : - पदवीधर व शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक -२०२०
मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्याबाबत.

महोदय,

भारत निवडणूक आयोगाने दिनांक २ नोव्हेंबर, २०२० च्या प्रसिध्दीपत्रकान्वये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या औरंगाबाद विभाग, पुणे विभाग, नागपूर विभाग या पदवीधर व अमरावती विभाग व पुणे विभाग या शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२० चा कार्यक्रम घोषित केला आहे. विद्यमान सदस्यांचा कालावधी दिनांक १९ जुलै, २०२० रोजी समाप्त झाला आहे. सदर निवडणूकीचे मतदान दिनांक १ डिसेंबर, २०२० (मंगळवार) रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत व मतमोजणी दिनांक ३ डिसेंबर, २०२० (गुरुवार) रोजी होणार आहे.

२. या निवडणूकीसाठी मतदार असलेल्या पदवीधर/ शिक्षक मतदारांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तीक रजा देणे आवश्यक आहे. यासंदर्भातील राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३/०६/२०११ च्या शासन निर्णयाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. तसेच सदरचा शासन निर्णय Ceo.Maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार या निवडणूकीच्या मतदारांना मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्यात यावी. सदरची रजा ही कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या नैमित्तीक रजेव्यतिरिक्त असणार आहे.

३. उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन आपल्या स्तरावरून याबाबोस स्थानिक वृत्तपत्राद्वारे तसेच दूरदर्शन व आकाशवाणी इत्यादी प्रसारमाध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी, ही विनंती.

आपली,

( शुभा बोरकर)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत: जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सर्व (नाशिक व कोकण विभागातील जिल्हे वगळून)

C:\Users\sanjay.garudkar\Desktop\Graduate Teacher २०२०\विधान परिषद पदवीधर शिक्षक मतदारसंघ . २०१८ - Copy.docx

विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या तसेच
शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या दिवशी संबंधित
मतदारसंघाचे मतदारांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर
करण्याबाबत

SO Tele - Maharashtra Legislative Council
Teachers/Graduates Constituencies

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक विनैर २०११/प्र.क्र.१४६/का २९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २३ जून, २०११

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानपरिषदेतील काही सदस्य पदवीधर मतदारसंघातून तसेच शिक्षक मतदारसंघातून निर्वाचित करण्यात येतात. पदवीधर मतदारसंघ/शिक्षक मतदारसंघामध्ये मतदार असलेल्या कर्मचा-यांना संबंधित मतदारसंघाच्या निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रजा मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात सर्वंकष विचार करून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

18/7/2011

**शासन निर्णय -**

The copies of this GAR ... regarding SCLE should be forwarded to all Divisional Commissioners & ROs (1) Collectors & AROs.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघातील तसेच शिक्षक मतदारसंघातील मतदार असलेल्या कर्मचा-यांना संबंधित मतदारसंघाच्या निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात यावी. सदर रजा ही कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजे व्यतिरिक्त असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

18/7/2011

( भा.र.गावित )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
राज्यपाल यांचे परिव्यार प्रबंधक,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
मंत्रालयीन विभागातील सर्व सचिव, प्रधान सचिव व अपर मुख्य सचिव,